# वित्तीय संस्थांनी एकत्रितपणे केली पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्पाची पाहणी

पुणे, दि. 18 जानेवारी, २०१८ : आर्थिक व्यवहार विभागाने केलेल्या शिफारशी नंतर युरोपीयन इन्व्हेस्टमेंट बँक (ईआयबी) आणि फ्रेंच डेव्हलपमेंट एजन्सी (एएफडी) या दोन्ही बँका पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्पाला अनुक्रमे ६०० दशलक्ष व २४५ दशलक्ष युरो कर्जाची आर्थिक मदत करण्याबाबत सकारात्मक असून यांपैकी युरोपीयन इन्व्हेस्टमेंट बँकेने (ईआयबी) पुणे मेट्रो प्रकल्पाला एकदा तर फ्रेंच डेव्हलपमेंट एजन्सीने (एएफडी) प्रकल्पाला दोनदा भेट दिली आहे. नुकतीच या दोन्ही वित्तीय संस्थां नी एकत्रितपणे पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्पाची पाहणी केली.

ज्यामध्ये त्यांनी सदर प्रकल्पावर काम करणा-या टीम बरोबरच, प्रकल्प अधिकारी, सल्लागार यांची भेट घेतली. या भेटी दरम्यान ईआयबीच्या शिष्ठमंडळाने प्रकल्पाच्या भुयारी मार्गाचे काम, मेट्रोचे ट्रॅक, डबे (रोलिंग स्टॉक), लिफ्ट आणि एस्कलेटर यासाठी करण्यात येणा-या कर्जपुरवठ्याबाबतीत संबंधित अधिका-यांशी चर्चा केली. तर एएफडीच्या शिष्ठ मंडळातील प्रतिनिधींनी सिग्नलिंग आणि टेलिकॉम यंत्रणा यासाठी लागणा-या अर्थ सहाय्याबद्दल चर्चा केली. याबरोबरच दुस-यांदा पाहणी कार्यासाठी आलेल्या एएफडीच्या टीमने प्रकल्पाच्या आजवरच्या प्रगतीची देखील पाहणी केली.

या पाहणी दरम्यान फ्रेंच डेव्हलपमेंट एजन्सी (एएफडी) यांच्या शिष्ठमंडळात पर्यावरण आणि सामाजिक प्रकल्प व्यवस्थापक सॅल्व्हीयन बेर्नाड, वाहतूक विभागाचे प्रकल्प प्रमुख प्रमुख मॅथ्यू व्हर्डियुअर आणि वाहतूक विभागाचे प्रोजेक्ट ऑफिसर रजनीश अहुजा यांचा समावेश होता. तर युरोपीयन इन्व्हेस्टमेंट बँक (ईआयबी) यांच्या शिष्ठमंडळात वरिष्ठ कर्ज वितरण अधिकारी सुनीता लुख्खू, सस्टेनेबल अर्बन मोबिलिटी विभागाचे वरिष्ठ अभियंता झोल्टन डोनथ, अभियंते बिर्गीनी क्यूएलट आणि सामाजिक तज्ज्ञ वेंकट राव यांचा समावेश होता.

या दोन्ही शिष्ठमंडळानी या भेटी दरम्यान कास्टिंग यार्ड, लेबर कॅम्प, नदीपात्रातील प्रकल्पाचा मार्ग यांची पाहणी केली. याबरोबरच त्यांनी पर्यावरण आणि सामाजिक विषयाशी निगडीत प्रश्नासंदर्भात महामेट्रोच्या सल्लागारांशी देखील सखोल चर्चा केली.

याविषयी अधिक माहिती देताना महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. ब्रिजेश दिक्षीत म्हणाले की, सध्या महामेट्रोच्या वतीने पीसीएमसी ते रेंज हिल आणि वनाझ ते सिव्हील कोर्ट या दोन्ही

मार्गीकांवर पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्पाचे काम वेगाने सुरू असून या दोन्ही मार्गांवर महामेट्रोने गेल्या वर्षभरात केलेल्या कामाचा आढावा या दोन्ही शिष्ठमंडळानी घेतला. हे करीत असताना महामेट्रोने इतक्या कमी वेळेत केलेल्या कामाची प्रशंसा देखील या दोन्ही एजन्सीनी केली. या दोन्ही शिष्ठमंडळातील प्रतिनिधी मेट्रोच्या या प्रगतशील प्रकल्पाच्या गतीमुळे आनंदी आहेत. याबरोबरच तोडण्यात आलेल्या एका झाडाच्या बदल्यात १० झाडांचे रोपण आणि वृक्षांचे पुनर्रोपण यांसारख्या महामेट्रो पर्यावरणा संदर्भात घेत असलेल्या विविध उपाययोजनांचे कौतुक देखील या शिष्ठमंडळाने केले आहे.

येत्या मार्च महिन्या अखेरपर्यंत या दोन्ही वित्तीय संस्थांकडून ८४५ दशलक्ष युरो इतक्या कर्जाला मंजूर मिळून लवकरच कराराची प्रक्रिया पूर्ण होईल अशी माहिती यावेळी महामेट्रोचे कार्यकारी संचालक रामनाथ सुब्रमण्यम यांनी सांगितले.